नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 13/03/2021 (शनिवार)
(दुपार)

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत 01 कि. मी. अंतरावर नरखेड येथे दिनांक 13/03/2021 चे 11.35 वा. ते 12.05 वा. दरम्यान नरखेड पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन नरखेड पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एमएच – 40/बीजी– 3402 क्रमांकाच्या टाटा एस पीकअप गाडीला थांबवुन तपासले असता त्यामध्ये एकुण 07(गोरे) कि. 35,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपी नामे– मुरलीधर शेषराव भोयर, वय 29 वर्ष, रा. थुगाव नीपानी ता. नरखेड याच्या ताब्यातुन जनावर व वाहनासह एकुण किंमती 2,35,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोशि श्री. हेमंत राठोड, पो.स्टे. नरखेड यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11 (1)(ड) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, तसेच कलम 83,177 मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक श्री. दिनेश वरठे 9284295922 हे करीत आहे.

सदर कार्यवाही श्री. राकेश ओला पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण, श्री. राहुल माकणीकर अपर पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण, उपविभागीय पोलिस अधिकारी काटोल विभाग श्री नागेश जाधव यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार पोलिस निरिक्षक श्री. जयपालसिंह गिरासे, पोउपनि अरूण खुटेमाटे, पोलीस नाईक श्री. दिनेश वरठे, पोशि हेमंत राठोड, गौरव बकाल, विश्वनाथ ढोणे, पृथ्वीराज चव्हाण यांनी पार पाडली.

## गळफास लावून मृत्यू

पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 25 कि. मी. अंतरावर मौजा हिवरमठ शिवार येथे दिनांक 12/03/2021 चे 08.00 वा. ते 09.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– विकास बंडुजी मानेराव वय 21 वर्ष, रा. वार्ड क्र. 3 लोहारी सावंगा ता. नरखेड हा आपले घरी हजर असता त्याचे वडील/मृतक नामे– बंडु केशवजी मानेराव वय 55 वर्ष, रा. वार्ड क्र. 3 लोहारी सावंगर ता. नरखेड यांनी घरासाठी इंघनाच्या काड्या आणण्यासाठी जंगलात गेले व तिथे कडुलिंबाच्या झाडाला कपडयाच्या दोरीने त्यांनी गळफास घेवुन आत्महत्या केली. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सुरू आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर